आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
११ ऑक्टोबर २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री आज चेन्नई दौऱ्यावर/ १३ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध कामांचं करणार लोकार्पण आणि पायाभरणी

- परदेशी गुंतवणूकदारांनी ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत भारतीय शेअर बाजारातून ४४ हजार १६६ कोटी रुपये काढून घेतले

- कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांची एक वर्ष शांतता राखण्याच्या अटीवर सुटका

**आणि**

- सौदी अरेबियातल्या रियाध विमानतळावरच्या हल्ल्यात १२ जण ठार तर ३०० पेक्षा जास्त जखमी

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज चेन्नईच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी ते राज्यातल्या १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध प्रकल्पांचं उदघाटन करतील. तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय, त्यांचे मंत्रिमंडळातले सहकारी, आणि इतर नेत्यांनी प्रधानमंत्री मोदी यांचं आज सकाळी चेन्नईमध्ये स्वागत केलं. चेन्नईमध्ये पोरूर इथल्या कार्यक्रमाच्या स्थळाकडे जाताना प्रधानमंत्री मोदी यांनी 'रोडशो' केला. पोरूर ते पूनमल्ली दरम्यानच्या मेट्रो रेल्वे सेवेची त्यांनी सुरुवात केली. त्यानंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्याबरोबर त्यांनी मेट्रो ने प्रवास केला.

प्रधानमंत्री मोदी आज चेन्नईमधल्या साडे-सातशे कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटन करतील. यामध्ये 'अमृत भारत स्टेशन' योजनेअंतर्गत पुनर्विकसित करण्यात आलेल्या पलानी, वेल्लोर कँटोनमेंट, अंबा-समुद्रम, परमकुडी आणि नमक्कल इथल्या पाच 'अमृत स्थानकांचा' समावेश आहे.

आयआयटी मद्रास इथल्या 'सुधा गोपालकृष्णन ब्रेन सेंटर'चं प्रधानमंत्री मोदी आज लोकार्पण करतील. या वैज्ञानिक उपक्रमामध्ये, मानवी जीवनचक्रात विविध टप्प्यांवर मेंदूचा विकास कसा होतो, याचा अभ्यास दर्शवणारे त्रिमितीय नकाशे तयार केले जातील.

सागरी पायाभूत सुविधांना बळकट करणाऱ्या तसंच  कार्गो हाताळणी सुविधांच्या विस्ताराला आणि लॉजिस्टिक कार्यक्षमता सुधारण्यासाठी उपयोगी ठरणाऱ्या विविध राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते आज होणार आहे.

आपल्या दौऱ्यात ते कामराजार बंदरावरच्या एका प्रकल्पाचं उदघाटन आणि अतिरिक्त कंटेनर टर्मिनलसाठीच्या कामाची पायाभरणी करतील.  नवी दिल्ली इथं रवाना होण्यापूर्वी प्रधानमंत्री 'जयगोपाल गरोडिया हिंदू विद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यातही सहभागी होतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेनं होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत देशातलं सर्वात मोठं ग्रीनफील्ड बंदर वाढवण या प्रकल्पाबाबत.

**-   - होल्ड - VC - - -**

*(वाढवण बंदर हा देशातला सर्वात मोठा आणि महत्त्वाकांक्षी ग्रीनफील्ड बंदर प्रकल्प आहे. पश्चिम किनाऱ्यावर जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट इथल्या बंदरांवरचा ताण कमी करण्यासाठी उभारण्यात येणारा हा प्रकल्प केंद्रसरकारच्या सागरमाला कार्यक्रमाचा भाग आहे. महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यात डहाणू इथं समुद्रापासून ५ किलोमीटर अंतरावर हा प्रकल्प असून या परिसरात समुद्राची नैसर्गिक खोली २० मीटर असल्याने तिथे मोठी मालवाहू जहाजं सहज नांगरता येतात. ३० ऑगस्ट २०२४ या दिवशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रकल्पाचं भूमीपूजन झालं. आणि जून २०२६ मधे प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. प्रकल्पासाठी ७६ हजार २२० कोटी रुपयांची तरतूद केली असून त्यातला ७४ टक्के वाटा केंद्रसरकारचा तर २६ टक्के वाटा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचा आहे. २०२९ पर्यंत प्रकल्पाचं काम पूर्ण होऊन तो कार्यान्वित होईल असा अंदाज आहे. सुमारे २९ कोटी ८० लाख टन मालाची उलाढाल करण्याची क्षमता या बंदरात असेल. या प्रकल्पामुळे १०*

*लाखाहून जास्त प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होईल. पश्चिम किनाऱ्यावरच्या या बंदरामुळे जागतिक दळणवळण आणि व्यापारात भारताला मोठा फायदा होईल.)*

<><><><><>

परदेशी गुंतवणूकदारांनी ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत भारतीय शेअर बाजारातून ४४ हजार १६६ कोटी रुपये काढून घेतले आहेत. कच्च्या तेलाचे वाढलेले दर, मजबूत झालेला अमेरिकी डॉलर आणि अमेरिकी रोख्यांवरचा वाढलेला परतावा, यामुळे या वर्षात परदेशी गुंतवणुकदारांनी ३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूक काढून घेतली असल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

दुसरीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रामुळे  उत्तर आशियायी बाजारपेठांचा विस्तार होऊ लागल्यानं परदेशी भांडवलदार तिकडे आकर्षित होऊ लागले असल्याचंही विश्लेषकांनी म्हटलं आहे.

<><><><><>

शारदीय नवरात्रौत्सव आजपासून सुरु झाला. दुर्गेच्या नऊ रूपांचं  पूजन करणारा हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी देशवासियां नवरात्रौत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दुर्गामातेच्या आशीवार्दाने सर्वांना शक्ती, समृद्धी आणि धैर्य लाभो असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी देशवासियांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. जगदंबा मातेच्या आशीर्वादाने सर्वांना सुख, शांती, समृद्धी आणि उत्तम आरोग्य लाभो असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दुर्गापूजनाचा सण गुजरात आणि पश्चिम बंगालमध्ये विशेष उत्साहात साजरा केला जातो.

<><><><><>

दिल्ली विमानतळावर ताब्यात घेतलेले कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजित दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर आज हजर केल्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. एका वर्षासाठी शांततेचा भंग न करण्याच्या अटीवर त्यांची सुटका झाल्याची माहिती सीजेपीच्या कायदेशीर कामकाज विभाग प्रमुख रत्ना सिंग यांनी दिली आहे.

<><><><><>

नवी दिल्लीतल्या अलिकडच्या आंदोलनांच्या घटनांसंदर्भात संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्तालयानं केलेल्या टिप्पणीचं भारतानं खंडन केलं आहे. देशाच्या अंतर्गत बाबींमधला हा हस्तक्षेप मान्य नसल्याचं भारतानं म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या याच संस्थेच्या परिसरात झालेल्या कारवाईवर कोणतीही टिप्पणी केली गेली नव्हतं, असं सांगत ही दुटप्पीपणा असल्याचं आणि यामुळं बहुपक्षीय संस्थांच्या विश्वासार्हतेला गंभीर धोका पोहोचत असल्याचं, भारतानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

दिल्लीत कायदा आणि सुव्यवस्थेची सद्यस्थिती लक्षात घेऊन मेट्रो आणि रेल्वे सेवा सुरू करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसंच, या परिसरात इंटरनेट सेवा अखंडित राहतील, याची खात्री करण्याचे निर्देशही केंद्र सरकारला दिले. आपल्या निर्देशांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली. या प्रकरणात सर्व बाजूंचं म्हणणं ऐकून घेतलं जाईल आणि कोणाचीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. शांततापूर्ण मार्गाने एकत्र जमणाऱ्यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलं जाणार नाही, तसंच वाहतुकीच्या नियमांचं पालन करून फिरण्याची मोकळीक राहील, असंही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

सौदी अरेबियातल्या रियाध आंतरराष्ट्रीय विमानतळावर काल  झालेल्या हल्ल्यात १२ जण ठार झाले तर  ३०० पेक्षा जास्त लोक  जखमी झाले आहेत. मृतांमध्ये सौदी अरेबियाचे चार नागरिक, बांगलादेशचे दोन, तर अमेरिका, इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सुदान आणि पॅलेस्टाईन या देशांच्या  प्रत्येकी एका नागरिकाचा समावेश आहे. शेजारच्या येमेनमध्ये इराण चं समर्थन असलेल्या हुथी बंडखोरांविरोधात सौदीच्या नेतृत्वाखाली नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर, सौदी विमानतळ, लष्करी पायाभूत सुविधा आणि तेल सुविधांचं लक्ष्य साधणाऱ्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली असून, हा हल्ला त्यापैकी एक आहे. रियाध विमानतळावर काल झालेल्या हल्ल्याबाबत त्यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

भारताने या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला असून, सौदी अरेबियाचं  सार्वभौमत्व जपण्यासाठी भारत तिथल्या जनतेच्या आणि सरकाराच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचं

परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या प्रदेशात लवकरात लवकर शांतता प्रस्थापित व्हावी अशी आशा भारतानं व्यक्त केली आहे.

रियाध विमानतळावर झालेल्या हल्ल्याचा संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस आणि अनेक देशांनी  तीव्र निषेध केला आहे. सामान्य नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांवर होणारे हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन करत असून, ते त्वरित थांबले पाहिजेत, असं गुटर्स यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. पॅलेस्टाईन, इजिप्त आणि कतार या देशांनी देखील या हल्ल्याचा निषेध केला आहे.

या हल्ल्यानंतर रियाध विमानतळाचं  कामकाज तात्पुरतं स्थगित करण्यात आलं, तर अनेक विमान कंपन्यांनी आपली उड्डाणं रद्द किंवा स्थगित केली.

**<><><><><>**

अमेरिकेत येत्या ३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांपूर्वी इराणच्या अमेरिकेतल्या कारवाया आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ते काल एका राजकीय सभेला संबोधित करत होते. या काळात अमेरिकेचं राजकीय नुकसान करण्याचा इराणचा प्रयत्न असला, तरी हे युद्ध लवकर थांबवण्यात अमेरिकेला यश मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

फेब्रुवारीच्या उत्तरार्धात हा संघर्ष सुरू झाल्यापासून अमेरिकेनं इराणची १५९ जहाजं बुडवल्याचा दावा त्यांनी केला. होर्मूझची सामुद्रधुनी या संघर्षाचा केंद्रबिंदू राहिली असून, त्यामुळे व्यावसायिक तेल वाहतुकीत अडथळा निर्माण झाला, आणि जागतिक ऊर्जा खर्चात वाढ झाली, असं ते यावेळी म्हणाले.

**//<><><><><>//**